## प्रेसनोट दिनांक १४/०३/२०१९

-----------------------------------------

## खडकीतील खुनाच्या गुन्हयातील मुख्य आरोपींना गुन्हे शाखा युनिट-४ कडून ८ तासात अटक

-----------------------------------------------------------------------------------------------------

दि.१३/०३/२०१९ रोजी १८/०० वाजताचे सुमारास बंगला नं.२६, ५१२ आर्मी बेस वर्कशॉप खडकी पुणे येथे राहणारा इसम नामे गोपाळ अर्जुन कांबळे याचा धारदार शस्त्राने खुन झाला याबाबत खडकी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १०४/२०१९ भा.दं.वि.कलम ३०२,४५२,१४३, १४७,१४८,१४९,३२३,५०४ महा.पोलीस अधिनियम ३७ (१)सह १३५ अन्वये गुन्हा दाखल असून सदरचा गुन्हा हा खडकीतील रेकॉर्डवरिल गुन्हेगार नामे १) राजेश राजू स्वामी वय २४ वर्षे रा. बंगला नं.३/१ मेथॅडिस्ट चर्च जवळ खडकी पुणे. २) सागर अशोक उंबरकर वय २४ वर्षे रा.सदर. ३) धिरज गोपाळ गवळी वय २४ वर्षे रा. ४२७ गवळीवाडा खडकीबाजार पुणे ४) रेणुका परदेशी ५) राधा राजु स्वामी यांनी केला असल्याचे समजले.

फिर्यादी यांचा मानलेला मुलगा यातील मयत इसम नामे गोपाळ अर्जुन कांबळे वय ३२ वर्षे हे बंगला नं.२६, ५१२ आर्मी बेस वर्कशॉप खडकी पुणे येथे एकत्र राहणेस होते. त्यांचे या नात्यास फिर्यादी यांचा भाचा आरोपी क्रमांक २ सागर उंबरकर याचा विरोध होता. त्या कारणावरुन आरोपी सागर, त्याचे नातेवाईक व मयत गोपाळ यांचेमध्ये वारंवार भांडणे होत होती. दिनांक १३/३/२०१९ रोजी दुपारी ३/३० वाजण्याचे सुमारास फिर्यादी व गोपाळ असे खडकी बंगला नंबर २२ येथे रिना गाडेकर याचे घरी बर्फ आणणेसाठी गेले होते. त्यावेळी तेथे यातील आरोपी महिला नामे राधा राजु स्वामी व रेणुका परदेशी यांनी फिर्यादी व गोपाळ याचेकडे पाहुन त्याचे संबधावरुन मस्करी केली होती. त्यावेळी त्याचे मध्ये किरकोळ वाद झालेला होता. त्यांनतर सायकांळी ५/०० वाजण्याचे सुमारास रेणुका परदेशी व राधा स्वामी यांनी फिर्यादीचे घराजवळ येवुन फिर्यादी व गोपाळ यास शिवीगाळ करुन निघुन गेल्या होत्या.सदर प्रकाराबाबत यातील मुख्य आरोपी सागर उंबरकर यास समजल्याने त्याने ,त्याचा मेव्हणा राजेश स्वामी, त्याची बहिण राधा स्वामी, मित्र धिरज गवळी व त्याची मैत्रीण यांनी संगनमत करुन वाढदिवस साजरा करण्याचे व दारु पिण्याचा बहाणा करुन मयत गोपाळ कांबळे याचे घरी जावुन त्याचेवर धारदार शस्त्राने वार करुन व दगडाने मारहाण करुन गोपाळ अर्जुन कांबळे याचा खुन केला आहे.

**श्री. भानुप्रताप बर्गे सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२, पुणे व पोलीस निरीक्षक श्री. अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा समांतर तपास करत असताना पो.हवा. राजू मचे व पो.ना.गणेश काळे यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सदर खुनाचे गुन्हयातील पाहीजे असलेले आरोपी हे बिजलीनगर चिंचवड येथील पाण्याचे टाकीजवळील रिक्षा स्टॅन्ड जवळ येवुन तेथुन बाहेर गावी जाणार असल्याची बातमी मिळाल्याने सपोनि गणेश पवार, पो.हवा.राजू मचे, पो.ना. गणेश काळे,विशाल शिर्के यांनी सदर ठिकाणी सापळा रचला. ते सदर ठिकाणी येताच त्यांना पोलीसांची चाहुल लागल्याने ते पळुन जात असताना त्यांना वरिल स्टाफने शिताफिने पकडले आहे. अशा प्रकारे गुन्हे शाखा युनिट-४, चे पोलीसांनी गुन्हयातील आरोपींचा शोध घेऊन त्यांना तात्काळ ताब्यात घेऊन आठ तासाचे आत सदर गुन्हा उघडकिस आणलेला आहे व सदर आरोपींना पुढील कार्यवाहीसाठी खडकी पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.**

**सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.प्रदिप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा -२, श्री. भानुप्रताप बर्गे, मा.पोलीस निरीक्षक श्री.अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश पवार, पोलीस हवालदार राजू मचे, गणेश काळे, विशाल शिर्के यांचे पथकाने केली आहे.**

पोलीस निरीक्षक,
युनिट-४, गुन्हे शाखा,पुणे शहर.